# साधना कला मंच

१११, डहाणूकर कॉलनी, लेन नं. ६, कोथरुड, पुणे - ४११ ०३८.
दूरध्वनी : ७२१८९०५९६६, ९५५२५०८२३२

KALA MANCH

दिनांक: ११ डिसेंबर २०१६

प्रति,
मा. प्राचार्य श्री. आनंद जुमले
एस.एन.डी.टी. महाविद्यालय,
संगीत विभाग, कर्वे रोड, पुणे - ४११ ०३८.

मा. महोदय,

**साधना कला मंच** ही संस्था गेली २४ वर्षे संगीत व साहित्य या करता कोथरुडमधे कार्यरत आहे हे आपल्याला ज्ञात आहेच, संस्था यावर्षी रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करत आहे व त्या निमीत्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्याचा मानस आहे.

**साधना कला मंच** तर्फे युवा कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी **साधना युवोन्मेष संगीत महोत्सव** डिसेंबर महिन्यात आयोजीत केला जातो. मान्यताप्राप्त विद्यापीठातील गुणी कलाकारांना व्यासपीठ मिळावे हा यामागे उद्देश आहे. गेली चार वर्षे आपण आपल्या संस्थेतील युवा गुणी कलाकार कार्यक्रमासाठी देत आहात. ही संकल्पना आणि युवा कलाकारांचे सादरीकरण साधनाच्या सर्व सभासदांच्या पसंतीस उतरले आहे. यंदा हा कार्यक्रम **२५ व २६ डिसेंबर** रोजी घेण्याचा मानस आहे. हा दोन दिवसाचा महोत्सव **हॅपी कॉलनी सभागृह, लेन नं.१, हॉटेल थाटबाटचेमागे, कोथरुड, पुणे -४११ ०३८ सायंकाळी ५ ते ८.३० या** वेळात होईल.

यावर्षी आपल्याकडून कु. श्रुती रामदासी व कु. अद्वैता जोगळेकर या युवा कलाकार वरील कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. प्रत्येक कलाकाराला ५० मिनीटे वेळ देण्यात येईल. कलाकार व साथीदार यांना योग्य ते मानधन देण्यात येईल.

या कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे, यानिमीत्ताने दोन्ही संस्थांचे स्नेहबंध दृढ होऊन रसिकांना उत्तमोत्तम कार्यक्रम देता येतील.

आपण केलेल्या सहकार्याबद्दल मन:पूर्वक आभार.

दि. दि. सावकार

(दीपा सावकार)
अध्यक्ष, साधना कला मंच